महसूल विभाग हा शासनाचा आधारस्तंभ - पालकमंत्री मकरंद पाटील >>पान 2

अतिवृष्टी पाहणी दौऱ्यात पालकमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर >>पान 3

'माहिती आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत गडचिरोलीत १०० अपील प्रकरणांची सुनावणी >>पान 4



दैनिक

# आपला विदर्भ




रिंकु राजगुरु, सुबोध भावेची धम्माल केमिस्ट्री; बेटर-हाफची लव्हस्टोरीमधलं गाणं प्रदर्शित

आतील पान

**सुविचार**

प्रत्येक समस्येचा एक सकारात्मक उपाय असतो.


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 14 ■ शनिवार, दि. 02 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## अतिवृष्टीग्रस्त भागांना दौरा; तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई देण्याचे निर्देश– ना.मकरंद पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलडाणा जिल्ह्यातील लोणार, सिंदखेडराजा आणि मेहकरसह इतर तालुक्यांमध्ये मागील काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली असून, शेतपिकांचे, घरांचे, जनावरांचे, विहिरींचे आणि रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहेत. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्याचे निर्देश, राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिले.





या पार्श्वभूमीवर राज्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी आज अतिवृष्टीग्रस्त गावांचा दौरा करून परिस्थितीची पाहणी केली. त्यांच्या सोबत आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, माजी आमदार संजय रायमुलकर, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपमुख कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, तहसीलदार भूषण पाटील यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

पालकमंत्री ना. पाटील यांनी लोणार तालुक्यातील देऊळगाव कुडपाळ, सिंदखेडराजा तालुक्यातील बिंबिखेळ आणि मेहकर तालुक्यातील वडगाव तेजन, डोणगांव या गावांना भेट देत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांकडून नुकसानीबाबतची माहिती घेतली. यावेळी त्यांनी तात्काळ पंचनामे करून स्थानिक स्तरावर मदत देण्याचे आणि शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

यावेळी बोलताना पालकमंत्री म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या नुकसानीकडे सरकार गांभीर्याने पाहत असून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे.पात्र शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही. सर्व नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत आणि शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरपाई मिळेल, यांची दक्षता प्रशासनाने घ्यावी.

दरम्यान, पालकमंत्र्यांनी लोणार सरोवराचीही पाहणी करून पर्यटकांसाठी सुविधा वाढवण्यासंबंधी सूचना दिल्या आणि पर्यटनविकासासाठी नियोजनबद्ध पावले उचलण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले.

## बेशिस्त वर्तन खपवून घेणार नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा



**नागपूर/प्रतिनिधी :** आता या प्रकारे कोणीही बेशिस्त वर्तन करेल, तर त्यांना सर्वांना सांगितलं आहे की,आम्ही हे खपवून घेणार नाही, कारवाई केली जाईल. जनतेच्या सेवेसाठी आम्ही आलो आहोत. मात्र, त्यावेळेस आपण काय बोलतो, कसं वागतो, आमचा व्यवहार कसा आहे, हे सर्व जनता पाहत असते. त्यामुळे त्यावर अंकुश राहिलाच पाहिजे.असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

मालेगावच्या निकालानंतर काँग्रेस पक्षाने हिंदू आतंकवाद किंवा भगवा आतंकवाद असा प्रकारचा नरेटिव्ह तयार केला होता.१९९० च्या दशकाच्या शेवटी २००० च्या सुरुवातीच्या वर्षात संपूर्ण विश्वात मोठ्या प्रमाणावर दहशतवादी घटना घडल्या. अनेक घटनांचे धागेदोरे पाकिस्तान पर्यंत होते. त्यामुळे इस्लामिक दहशतवाद असा नरेटिव्ह जगभर निर्माण झाला होता, तो काही भारताने निर्माण केलेला नव्हता. मात्र, या नरेटिव्हचा आपल्या व्होट बँक वर विपरीत परिणाम होत आहे, हे काँग्रेसच्या लक्षात आलं. सर्व मुसलमानांना आतंकवादी ठरवलं गेलं नव्हतं, तरी देखील सर्व हिंदूंना आतंकवादी ठरवण्याकरिता काँग्रेस पक्षाने हे षडयंत्र रचलं, यूपीएने हे षडयंत्र रचलं आणि हिंदू आतंकवाद असा शब्द निर्माण करून अनेकांना अटक केली गेली. प्रयत्न सुरू करून एका यंत्रणेवर दबाव आणून हिंदुत्ववादी संघटना खास करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी किंवा विचार परिवारातील अन्य संघटनांचे पदाधिकारी हे कसे भगवा आतंकवादामध्ये शामील आहेत. अशा पद्धतीचे षडयंत्र तयार करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, त्याचे कुठलेही पुरावे मिळाले नाहीत.त्यानंतर पुराव्याअभावी सुद्धा कारवाई करा असा दबाव पोलीस यंत्रणेवर होता. पोलीस यंत्रणेतील अनेक अधिकारी त्या दबावाला बळी पडले नाही. त्यामुळे पुढची कारवाई होऊ शकली नाही. अन्यथा हा खूप खोल रूतलेला षडयंत्र होता.आता त्याचा पर्दाफाश झाला आहे. हळूहळू यातील सर्व घटना बाहेर येतील आणि त्या वेळच्या भारतातील आणि राज्यातील सरकारने हिंदूंना दहशतवादी ठरवून हिंदू संघटनांना संपवण्याकरता त्यांच्यावर बंदी घालण्याकरिता एक प्रयत्न उभा केला होता हेच त्याच्यातून समोर आलं आहे. आधी पृथ्वीराज चव्हाण यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना सांगावं, कारण ज्या मनमोहन सिंग सरकारमध्ये ते होते आणि पीएमओ सांभाळत होते, त्याचं सरकारने याला भगवा दहशतवाद म्हटलं होतं.तेव्हा आठवलं नाही की हे छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा आहे. भगवा असेल, हिंदू असेल किंवा सनातन असेल यांच्यात कुठलाही भेद नाही, हे सर्व एक आहे आणि हे सर्व राष्ट्र प्रेमी, राष्ट्रवादी व राष्ट्रीय विचारांनी प्रेरित आहे. कोकाटे खाते बदल जी घटना घडली. त्या संदर्भात मोठा रोष होता. त्या संदर्भात अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्याशी मिळून चर्चा केली आणि चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे कोकाटे यांचे खाते बदलले आहे, त्यांना दुसरे खात देण्यात आले आहे आणि कृषी खात दत्तात्रय भरणे यांना देण्यात आले आहे. आता तरी कुठला दुसरा बदल होईल अशी कोणतीही चर्चा नाही. आता या प्रकारे कोणीही बेशिस्त वर्तन करेल, तर त्यांना सर्वांना सांगितलं आहे की,आम्ही हे खपवून घेणार नाही, कारवाई केली जाईल. जनतेच्या सेवेसाठी आम्ही आलो आहोत. मात्र, त्यावेळेस आपण काय बोलतो, कसं वागतो, आमचा व्यवहार कसा आहे, हे सर्व जनता पाहत असते. त्यामुळे त्यावर अंकुश राहिलाच पाहिजे. असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## दत्तात्रय भरणे राज्याचे नवे कृषीमंत्री

### कोकाटेंची उचलबांगडी; खाते अदलाबदलीचा महायुतीचा निर्णय

**मुंबई :** विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सत्ताधाऱ्यांसाठीच डोकेदुखीचे ठरले. शेतकऱ्यांविषयी काढलेल्या वादग्रस्त विधानांमुळे तसेच विधिमंडळात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे अडचणीत सापडले. विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. यामुळे त्यांच्याकडून कृषिमंत्री पद काढून घेत केवळ खातेबदल करण्यात आले आहे. दत्तात्रय भरणे यांच्याकडील क्रीडा आणि युवक कल्याण खाते कोकाटेंना दिले असून कृषी मंत्रिपद आता दत्तात्रय भरणे यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.



दत्तात्रय भरणे हे आता महाराष्ट्राचे नवे कृषीमंत्री असणार आहेत. ''एका शेतकऱ्याच्या मुलाला कृषीमंत्री पदाचा मान दिल्याबद्दल मी कृतज्ञ आहे'' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

## मला कृषी खाते घेण्यासाठी आग्रह केला : मंत्री छगन भुजबळ

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** ज्यावेळी आम्ही भाजप - शिंदें सोबत सरकारमध्ये आलो, त्यावेळी अजित पवारांनी अर्थ खाते घेतले. त्यावेळी माझ्या पुढे सर्व खाते ठेवले. मला कृषी खाते घेण्यासाठी आग्रह केला, मोठे खाते घेतले खूप आग्रह केला. पण ग्रामीण भागातील लोकांना द्या, हे मी सांगितले. माझे आयुष्य मुंबई मध्ये गेले आहे. मी शेतकरी प्रश्नावर मागे उभे राहतो. पण त्याची बारीकसारीक माहिती देणारे माणसे ग्रामीण भागात असतात. त्यामुळे भरणे मामा न्याय देतील.अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, माणिकराव कोकाटे यांचा मंत्रीपदाबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यावर निर्णय घेतात. मी अधिक बोलणं योग्य राहणार नाही. याआधी देखील अनेक कृषिमंत्री राहिले आहेत.देशाचे कृषिमंत्री म्हणून शरद पवार यांनी देखील काम केले आहे. त्यामुळे कुठल्या खात्यात काही अडचण राहत नाही. विरोधकांचा काम आहे, त्यामुळे ते राजीनामा मागतात. मालेगाव बॉम्बस्फोट निकाल गेल्या १५ दिवसात २ बॉम्बस्फोट प्रकरणी निकाल लागले. १५-१७ वर्ष तुरंगात राहिल्यानंतर त्यांना सांगण्यात आले की, त्यांचा काही दोष नाही. साध्वी आणि इतर ७ ते ८ वर्ष जेल मध्ये राहिले. मला कळत नाही लोक अनेक वर्षे जेल मध्ये राहतात, आणि नंतर सांगतात. यात तथ्य नाही. पोलीस चौकशीत काहितरी गडबड आहे. न्याय व्यवस्थेत बदल करण्याची गरज आहे. का? याबत सगळ्यांनी विचार केला पाहिजे. आयुष्यात ७ ते १७ वर्ष, मी स्वता दोन सव्वादोन वर्ष गेलो, किती मनस्ताप, त्रास होतो. हे नुकसान होते शारीरिक, मानसिक आर्थिक नुकसान होते. मला थोडे विचित्र वाटते, त्यांना मध्ये का ठेवले. कोर्टाचा निकाल



मान्य केला पाहिजे. १५ ते १७ वर्ष लोकांना आत ठेवा, नंतर सांगतात निर्दोष आहेत. याला जबाबदार कोण त्याच्या आयुष्याची धूळधाण होते. हा वेगळा प्रश्न समाज आणि देशापुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कोर्टाने प्रत्येक गोष्ट पडताळून पहिली आहे. चुकीचे माणसे पकडले वेगवेगळ्या संस्था आहे, कधी इकडचे कधी दिल्लीचे तपास करतात. अजूनही लोकांचा विश्वास न्याय व्यवस्थावर आहे. दत्ता मामा भरणे देखील ग्रामीण भागातून आलेले आहेत. का नाही न्याय देऊ शकणार? ते देऊ शकतील.ज्यावेळी आम्ही भाजप - शिंदें सोबत सरकारमध्ये आलो, त्यावेळी अजित पवारांनी अर्थ खाते घेतले. त्यावेळी माझ्या पुढे सर्व खाते ठेवले. मला कृषी खाते घेण्यासाठी आग्रह केला, मोठे खाते घेतले खूप आग्रह केला. पण ग्रामीण भागातील लोकांना द्या, हे मी सांगितले. माझे आयुष्य मुंबई मध्ये गेले आहे. मी शेतकरी प्रश्नावर मागे उभे राहतो. पण त्याची बारीकसारीक माहिती देणारे माणसे ग्रामीण भागात असतात. त्यामुळे भरणे मामा न्याय देतील. भरणे मामा ग्रामीण भागात राहिलेले आहेत. ते जास्त न्याय देऊ शकतात.भरणे मामा यांना अडचण येईल, असं वाटत नाही. प्रत्येक खात महत्वाचे असते. प्रत्येक खात हे चांगलं आहे, आपण कसे काम करतो यावर अवलंबून आहे.काही वेळा बीजेपी पक्षातील लोकांना टार्गेट केले जाते आहे. याबाबत मी फार बोलणे योग्य नाही.आमच्याकडे सुद्धा येवला चे इव्हीएम मशिन तपासले त्यात काही आढळले नाही. हे खरे आहे त्यात काही चुकीचे नाही.अशी माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## कोकाटे यांचे मंत्री पद बदलवण्याचा सर्वस्वी निर्णय हा अजित पवारांचा

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे मंत्रीपद बदलण्याचा सर्वस्वी निऱ्णय हा अजित पवार यांचा आहे. त्यांचे कृषी खात काढून त्यांना क्रीडा खात देण्यात आलेले आहे. अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, धनंजय मुंडे हे आमदार आहेत. त्यांनी काही कामासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतलेली असेल. असं नाही की, फक्त मंत्रिपदासाठी भेट घेतली असावी. कोणाशी बोलताना सांभाळून बोलले पाहिजे आणि ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्यांना तो मंत्र्यांना सुचना देण्याचा अधिकार आहे. ही टेक्निकल बाब आहे. एखाद्या खात्यामधून सर्व काही पैसे काढून घेतले जातात. असं काही होत नाही पुढे एडजस्टमेंट झाली की, त्या खात्यामध्ये पैसे टाकले जातील. हा निर्णय वित्त मंत्र्यांनी व मुख्यमंत्र्यांनी घेतलेला आहे. कोणावर

### जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची माहिती



संज्ञा होणार नाही, ज्या ज्या खात्यावर बजेट ठरलेला आहे. त्या त्या खात्याला तेवढे पैसे मिळणार आहेत.प्रांजल खेवलकर पोलीस तपास यासंदर्भामध्ये पोलीस चौकाची सुरू असून, पोलिसांनी आपला म्हणणं न्यायालयात मांडलेला आहे. हा विषय न्यायप्रविष्ठ झालेला आहे. जसे पुरावे येथील त्या प्रकारे कारवाई होईल.कोर्टाला तो सर्वस्वी अधिकार आहे. आणि कोर्टाने तो निर्णय घेतलेला आहे. एकनाथ खडसे वारंवार माझं नाव घेत असतात, मात्र मला त्यांच्याविषयी काही आता बोलायचं नाही.मालेगाव बॉम्बस्फोट निकाल भगवा दहशतवाद, भगव्याचा दहशतवाद असा आरोप करत काँग्रेसच्या काळात गोवण्यात आलं होतं.यामध्ये आठ दहा वर्ष त्या लोकांना खूप त्रास झाला, मात्र या संदर्भातला कुठलाही पुरावा त्या ठिकाणी नव्हता.न्यायालयाने त्यांची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केलेली आहे. आणि हा निर्णय स्वागतार्ह आहे. ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते अनेक जण भाजपात प्रवेश करण्यासाठी उत्सुक आहेत. तारखा ही मागत आहेत. उत्तर महाराष्ट्रातील अनेक जण भाजपा येण्यासाठी इच्छुक आहेत. त्यांचा पक्षप्रवेश ही लवकरच होईल.प्रणिती शिंदे ऑपरेशन सिंदूर वक्तव्य केले. आता काय बोलावे प्रणिती शिंदे बद्दल. एवढा मोठा अटॅक त्या ठिकाणी झाला. आपली इतके सारे लोक त्या ठिकाणी मारले गेले. इतकं चोख उत्तर आपल्या सेनेने त्यांना या ठिकाणी दिले आहे. आमदार म्हणून वाटलं तर आमच्या सोबत या मात्र काहीही बोलून वक्तव्य करू नये, असे मतही यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केलं.

## वाल्मीक कराडसह आरोपींची प्रॉपर्टी जप्त करून सरकारच्या तिजोरी जमा करा : धनंजय देशमुख यांची मागणी

**बीड/प्रतिनिधी :** चुकीच्या पद्धतीने लोकांना संपवून जे अर्थकारण केले गेले आहे. लोकप्रतिनिधींचा अभय घेऊन जी काय माया जमवली आहे, ती सगळी आरोपीची प्रॉपर्टी जप्त करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी, अशी मागणी धनंजय देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, चुकीच्या पद्धतीने हे अर्थकारण केले गेले होते. ती सगळी प्रॉपर्टी जमा करून सरकारच्या तिजोरीत जमा करावी,४ तारखेला सगळ्या अर्जावरची एकत्र सुनावणी होऊन, चार्ज फ्रेम होणे आम्हाला अपेक्षित आहे. तपास यंत्रणाच्या मागावर आम्ही आहोत. परळीच्या लोकप्रतिनिधींच्या सोबतची एक प्रॉपर्टी आहे, त्याचे कागदपत्र मी तुम्हाला देऊ शकतो.जेलमधील त्या मोबाईलची सीडीआर काढा, त्या मोबाईलची कसून चौकशी करा. ही माझी मागणी होती.मुख्य आरोपी बाहेर येणार हे सांगून त्याचे बगलबच्चे रिल्स बनवत होते. असा आरोप धनंजय देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना केला.

## नैसर्गिक आपत्ती संदर्भात पालकमंत्री यांनी घेतला आढावा; प्रशासनाला तत्काळ मदतीचे निर्देश : ना. मकरंद पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पावसामुळे झालेल्या नुकसानीची गंभीर दखल घेत राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीची मदत पोहोचवण्याचे व पंचनामे तत्काळ पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे,, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

पालकमंत्री मकरंद पाटील म्हणाले, ''नैसर्गिक आपत्ती ही अनपेक्षित असली, तरी नागरिकांवर त्याचे परिणाम गंभीर असतात. अशावेळी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने प्रतिसाद द्यावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आणि नागरिकांना कुठलाही अडथळा न होता शासकीय मदत तातडीने पोहोचली पाहिजे. नुकसानीचे वर्गीकरण करुन पंचनाम्याचे काम झपाट्याने पूर्ण करा. जिल्हाधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रातील नुकसानीचे मदत तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावावी. तसेच शासन स्तरावरील प्रस्ताव सादर करावा, जेणेकरून अनुदान व भरपाई तत्काळ मंजूर होऊ शकेल.

बैठकीत पूरस्थितीग्रस्त, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेली शेती, घरांचे नुकसान, रस्ते वाहतूक तसेच वीज आणि पाणीपुरवठा या बाबींची सविस्तर माहिती घेण्यात आली. तसेच एप्रिल ते जून २०२५ या कालावधीत अवेळी पाऊस, गारपीठ व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे मदत येत्या आठ दिवसात लाभार्थ्यांना मिळेल यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश पालकमंत्री ना.पाटील यांनी यावेळी दिले.



## तंत्रज्ञानाचा दुरुपयोग

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. आजच्या या इंटरनेट युगात सोशल मीडिया हा परवलीचा शब्द बनला आहे. सोशल मीडियाचा वापर करत नाही असा व्यक्ती आज शोधूनही सापडणार नाही. लहानांपूसून थोरांपर्यंत, गरिबांपासून श्रीमंतापर्यंत, सर्वसामान्यांपासून सिलेब्रेटिंपर्यंत सर्वचजण सोशल मीडियाचा वापर करतात मात्र आज हाच सोशल मीडिया सीलेब्रेटिंसाठी डोकेदुखी बनत आहे. सोशल मीडियाचा वापर करून विविध प्रकारच्या अफवा पसरवल्या जातात हे तर आपल्याला माहीतच आहे. कधी सिलेब्रेटिंच्या निधनाच्या अफवा पसरवल्या जातात तर कधी सिलेब्रेटिंचे फोटो मोर्फ करून त्यांची बदनामी केली जाते तर कधी विविध प्रकारचे मिम्स बनवून त्यांची टर उडवली जाते. आता तर एआयच्या मदतीने सिलेब्रेटिंचे थेट डीपफेक व्हिडिओ बनवून त्यांना बदनाम केले जात आहे. मागील वर्षी बॉलिवूडची नवोदित पण लोकप्रिय अभिनेत्री असलेली रश्मीका मंधना हीचा असाच एक डीपफेक व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल करण्यात आला होता. सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर कला क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली होती. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर स्वतः अभिनेत्री रश्मीका हिने हा व्हिडिओ तिचा नसल्याचे सांगून व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून तिला मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे सांगितले. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर बिग बी अमिताभ बच्चन यांनीही संताप व्यक्त केला होता. केवळ याच अभिनेत्रीचे नाही तर हिच्यासारख्या अनेक अभिनेत्रीचे असे मॉर्फ केलेले व्हिडिओ सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. केवळ बॉलिवूडच्या अभिनेत्रींचेच नाही तर भारतीय क्रिकेट संघातील महत्वाच्या आणि मोठ्या खेळाडूंचेही अभिनेत्रींसोबतचे मॉर्फ व्हिडिओ सोशल मिडियावर फिरत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेले हे व्हिडिओ एडिटिंग केलेले असतात. मूळ चेहरा लपवून त्याजागी सिलेब्रिटींचा चेहरा लावण्यात येतो. हे व्हिडिओ एडिटिंग करताना एआय या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. डीपफेक हा शब्द डीप लर्निगमधून घेण्यात आला असून तो एक शिकण्याच्याच प्रकार आहे. या शब्दात डीप हा शब्द असल्याने या शब्दाला अनेक पदर आहेत. डीप लर्निंग हे कृत्रिम न्युरल नेटवर्कवर आधारित आहे. या अल्गोरिदममध्ये बनावट साहित्य आणि भरपूर डेटा प्रविष्ट करून त्याचे एका विशिष्ट सामुग्रिमध्ये रुपांतरीत केली जाते. जी माणसे तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर करतात अशी माणसं बदला घेण्यासाठी डीप फेकचा वापर करतात. एआयच्या मदतीने व्हिडिओ आणि फोटो एडिट करून लोकांना त्रास दिला जातो. इथे मात्र बदला घेण्यासाठी नाही तर बदनामी करण्यासाठी याचा वापर केला गेला. तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती केली आहे. विज्ञानाच्या मदतीने दररोज नवे तंत्रज्ञान उदयास येत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर मानवी कल्याणासाठी केला पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाचा हेतू मानवी कल्याण हेच आहे मात्र काही नतद्रष्ट लोक या तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी नाही तर समाज विघातक कार्यासाठी करतात हा प्रकार त्यातलाच आहे. वास्तविक कोणाचाही असा फेक व्हिडिओ बनवून बदनामी करणे हा गुन्हा आहे. अशा समाज विघातक लोकांना कायद्याने कडक शिक्षा व्हायलाच हवी. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग ही नवीच समस्या आता निर्माण झाली आहे. तंत्रज्ञानाचा असा दुरुपयोग करून कोणाचीही सहज बदनामी करता येत असल्यानेच अमिताभ बच्चन यांनी सोशल मीडिया वापरावा की नाही असा प्रश्न विचारला आहे. केवळ सिलेब्रेटिंच्या जीवनातच नव्हे सर्वसामान्यांच्या जीवनातही अशाप्रकारे तंत्रज्ञानाचा वापर कोणी केला तर त्यांचे आयुष्यच उध्वस्त होते म्हणूनच अशाप्रकारे तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करणाऱ्या नतद्रष्टांना शिक्षा झालीच पाहिजे.

# महसूल विभाग हा शासनाचा आधारस्तंभ - पालकमंत्री मकरंद पाटील

➤ महसूल दिनी पालकमंत्री, जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या बांधावर ➤ महसूल दिन उत्साहात साजरा ➤ उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार ➤ लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे व अनुदानाचे वाटप

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महसूल विभागाच्या कार्यक्षमतेचा गौरव करत, जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी महसूल दिनानिमित्त विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत त्यांचे मनोबल वाढवले. ''महसूल विभाग हा शासनाचा कणा असून, जनतेला पारदर्शक व तत्पर सेवा देण्यासाठी या विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी केले.

महसूल दिनाचे औचित्य साधून जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी आज शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे समस्या जाणून घेतल्या. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने भरपाई देण्याचे निर्देश, पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी यावेळी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित महसूल दिन कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर तांबे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, डॉ. जयश्री ठाकरे, समाधान गायकवाड, उपमुख कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, महसूल व विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

महसूल दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री मकरंद पाटील यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना महसूल विभागाच्या कार्याची सखोल प्रशंसा केली. त्यांनी सांगितले की, ''शासन आणि जनतेच्या दरम्यान विश्वासाचे सेतू बांधण्याचे काम महसूल विभाग करत आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीचे हक्क, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत, विविध शासकीय योजना आणि नागरिकांच्या जीवनाशी थेट संबंधित निर्णय या विभागाच्या माध्यमातून घेतले जातात. त्यामुळे शासकीय कामामध्ये नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक परिणामकारक बनवण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. पालकमंत्र्यांनी महसूल कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचे कौतुक करत, पारदर्शकता, जबाबदारी आणि तत्परता या गुणांचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच शासकीय कामकाज करताना पालकमंत्री म्हणून मी, सदैव अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले की, महसूल विभाग विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत असून शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडवले जात आहेत. दि. ४ ते ६ ऑगस्ट या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत नागरिकांच्या तक्रारीवर तात्काळ उपाय केले जातील, असे त्यांनी सांगितले. नागरिकांचे, शेतकऱ्यांचे कामे प्राधान्याने, पारदर्शक व गतिमानतेने करा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी महसूल दिनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ई महसूल प्रणाली माहिती पुस्तिकाचे ऑनलाईन विमोचन पालकमंत्री व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्हा महसूल प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी वनहक्क पट्टे, नझूल भूखंड वाटप, जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत लाभार्थ्यांना सातबारा वितरण आदींचे वाटप करण्यात आले.



उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रास्ताविकात महसूल दिन व सप्ताहात राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तहसिलदार वृषाली केसकर यांनी तर आभार उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी केले.

पालकमंत्र्यांच्या हस्ते उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार

महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांच्याहस्ते स्मृतिचिन्ह देवून करण्यात आला. यामध्ये उपजिल्हाधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसिलदार भुषण पाटील, तहसिलदार वृषाली केसकर, नायब तहसिलदार एस.एस. वट्टे, सहा.म.अधिकारी दिपक भाष्कर, महसूल सहायक जे.एन.वाघ, मंडळ अधिकारी संजय दिनकर जोशी, मंडळ अधिकारी शिवाजी भरगडे,ग्राम महसुल अधिकारी अमोल हिरालाल राठोड, वाहन चालक अशोक देवकर,शिपाई रामेश्वर शिंदे,महसूल सेवक तौफिकखान अब्दुलखान पठाण,पोलीस पाटील योगेश मधुकर पाटील, तसेच उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी म्हणून तहसिलदार संतोष काकडे, सहा.म.अधिकारी पल्लवी राठोड, मंडळ अधिकारी किशोर पाटील, महसूल सेवक आर.एन.अडकणे यांचासह भूमी अभिलेख विभाग, सह निंबधक कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सत्कार करण्यात आला.

## धावत्या एसटीमध्ये प्रवाशावर कोयत्याने जीवघेणा हल्ला, बारामती हादरली

**बारामती/प्रतिनिधी :** राज्यात मागील काही दिवसांपासून 'कोयता गँग'च्या हल्ल्यांनी दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशाचप्रकारचा एक धक्कादायक प्रकार आता बारामती परिसरात घडला आहे. बारामतीवरून इंदापूरला जात असलेल्या एसटी बसमध्ये एका प्रवाशावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला. विशेष म्हणजे, हल्ल्यानंतर आरोपीने स्वतः वरही वार करण्याचा प्रयत्न केला. मात्, काही प्रवाशांनी प्रसंगावधान दाखवत त्याला अडवले. या प्रकारामुळे बसमध्ये प्रचंड गोंधळ उडाला आणि परिसरात खळबळ माजली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, इंदापूर आगाराची ही एसटी बस बारामतीहून इंदापूरच्या दिशेने निघाली होती. बस जेव्हा काटेवाडी परिसरात पोहोचली, त्यावेळी मागच्या सीटवर बसलेल्या एका तरुणाने शेजारील प्रवाशावर अचानक कोयत्याने हल्ला चढवला. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, तो रक्तबंबाळ अवस्थेत बसमधून खाली उतरून निघून गेला.

हल्लेखोर आरोपी एवढ्यावरच थांबला नाही. त्याने त्या कोयत्याने स्वतःवर, विशेषतः गळ्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र बसमधील काही जागरूक प्रवाशांनी वेळीच हस्तक्षेप करत त्याला रोखले आणि त्याच्या हातून कोयता काढून घेतला. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन आरोपीला ताब्यात घेतले.

## पिंपळगाव काळे येथील नागरिकांचा स्मार्ट मीटरला विरोध, स्मार्ट मिटर काढा; नाहीतर आम्ही काढू



**दैनिक आपला विदर्भ**

**पिंपळगाव काळे /प्रतिनिधी :** जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे गावातील शेकडो नागरिकांना त्यांचे सुरळीत चालू असलेले पोस्टपेड मीटर काढून त्यांना स्मार्ट मीटर लावण्यात आले आहे. परंतु ज्यांनी स्मार्ट मीटर लावले त्यांना तीन पट चार पट मासिक लाईट बिल आलेले आहे. वारंवार तोंडी व लेखी तक्रारी संबंधित विभागाला देऊन सुद्धा आमच्या समस्यांचे निवारण होत नाही आम्हाला आलेले जास्त प्रमाणामध्ये आलेले लाईट बिल तात्काळ कमी करण्यात यावे यासंदर्भात यापूर्वी पिंपळगाव काळे उपकेंद्राचे कनिष्ठ अभियंता यांच्याकडे सुद्धा तोंडी व लेखी सूचना दिल्या आहेत.

परंतु त्यावर त्यांनी कोणतीही ठोस भूमिका अथवा कारवाई केली नाही. यापुढेही दर महिन्याला सातत्याने आम्हाला असे अवाजवी दुप्पट तिप्पट बिल येतील तर ते बिल आम्ही कुठून भरायचे तेवढी आमची आर्थिक परिस्थिती नसून आम्ही मोल मजुरी करून जीवन जगणारे नागरिक आहोत आम्हाला एवढ्या मोठ्या प्रमाणात आलेले वीज बिल भरणे अशक्य आहे ते आम्ही कदापिही भरणार नाही. तुमच्या या सक्तीला आम्ही बळी पडणार नाही तुमच्या फायद्यासाठी लावलेले हे स्मार्ट मीटर आमचे जीव घेणारे आहेत हे नाकारता येत नाही.

आम्हाला आलेले वीज बिल हे मागील महिन्यापेक्षा जास्त प्रतीने आलेले आहेत ते आम्हाला सुरळीत करून देण्यात यावे किंवा आपण लावलेले स्मार्ट मीटर तात्काळ काढून आमचे आधी असलेले पोस्टपेडमीटर लावण्यात यावे. यावर महावितरण ने दहा दिवसात वरील दोन्ही पैकी कोणतेही कारवाई न केल्यास येत्या दहा दिवसानंतर पिंपळगाव काळे येथील आमच्या घरी लावलेले स्मार्ट मीटर आम्ही काढून महावितरण कंपनी कार्यालय पिंपळगाव काळे येथे आणून देणार आहोत यासंदर्भात दिनांक २८/७/२०२५ सोमवार रोजी लेखी निवेदन व अल्टिमेटम कनिष्ठ अभियंता पिंपळगाव काळे यांना देण्यात आले आहे, निवेदन देते वेळी सारथी फाउंडेशन अध्यक्ष प्रकाश भिसे, गोपाल ढगे, संतोष शेलकर, ओम वरनकार, रविन्द्र राऊत, ईश्वर राऊत आदी नागरिक उपस्थित होते.!

## महिला अत्याचार प्रकरणी विशेष न्यायालय स्थापन्याचा निर्णय कौतुकास्पद : संजनाताई गवळी

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** अलीकडच्या काळात महिलांवरील अत्याचारांच्या वाढत्या घटनांमुळे समाजमन ढवळून निघाले आहे. अशा घटना समाज तथा सरकारसाठी चिंतेची बाब ठरत आहेत. त्यानुषंगाने महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी आणि वाशीम येथे विशेष न्यायालये स्थापन करण्यास नुकतीच राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

त्यामुळे सरकारच्या या निर्णयामुळे महिला वर्गास दिलासा मिळाला असून सरकारचा हा निर्णय कौतुकास्पद आहे. असे मत शिवसेना शिंदे गटाच्या युवा नेत्या संजनाताई गवळी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.



संजनाताई गवळी यांनी पत्रकात म्हटले की, महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी सध्या राज्यात २० पॉक्सो आणि १२ जलदगती विशेष न्यायालये कार्यरत आहेत. या न्यायालयाच्या माध्यमातून महिलांवरील अत्याचारांच्या प्रकरणांची ६०दिवसात निर्णय प्रक्रिया पूर्ण होत आहे. त्यामुळे पिडीत महिलांना वेळेत न्याय मिळत आहे. सदर न्यायालयाची उपयुक्तता लक्षात घेता आता याच धर्तीवर सरकारने अत्याचार पिडीत महिलांना त्वरेने न्याय मिळण्यासाठी गोंदिया, रत्नगिरी आणि वाशीम येथे विशेष न्यायालये स्थापन्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे महिलांवरील अत्याचारांची प्रकरणे जलद गतीने सुटणार असून दोषींना शासन सुद्धा होणार आहे. या प्रक्रीयेत आपसुकच गुन्हेगारीचे प्रमाण सुद्धा घटणार आहे.

राज्य सरकारने यापूर्वी वाशीम येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास परवानगी दिली आहे. तर, आता महिलांवरील अत्याचारांची प्रकरणे जलद गतीने निघाली काढण्यासाठी स्वतंत्रपणे विशेष न्यायालय स्थापन्याचा निर्णय घेतला आहे. विकासात्मक दृष्ट्या सरकारचे हे धाडसी निर्णय आकांक्षित वाशीम जिल्ह्यासाठी निश्चीतच फायदेशीर ठरणार आहेत. त्यामुळे राज्य सरकारचा हा निर्णय कौतुकास्पद व स्वागतार्ह आहे.असेही संजनाताई गवळी यांनी पत्रकात म्हटले आहे.

## मेहकर लोणार तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित झालेल्या ५० हजार हेक्टर वरील शेती, पिकांची नुकसान भरपाई मिळवून देण्याची संजय रायमुलकर यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार तालुक्यात जून व जुलै महिन्यात झालेल्या ढगफुटी सदृश अतिवृष्टीच्या पावसामुळे दोन्ही तालुक्यातील जवळपास ५० हजार हेक्टर वरील पिकांचे व शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याची मागणी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी पालकमंत्री मकरंद पाटील यांच्याकडे केली.





आज लोणार तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ व वडगाव तेजन आणि मेहकर तालुक्यातील डोणगाव परिसरातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागांची पाहणी पालकमंत्री मकरंद पाटील व माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केली. नदी नाल्यांकाठची शेती पुरामुळे संपूर्णतः खरडून गेली आहे. असे दोन्ही तालुक्यातील क्षेत्र जवळपास १२ हजार हेक्टर आहे. त्या क्षेत्राची आवर्जून पाहणी करण्यासाठीचा आग्रह संजय रायमुलकर यांनी पालकमंत्र्यांना केला. देऊळगाव कुंडपाळ येथील तलावाच्या भिंतीला भगदाड पडल्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचीही पाहणी यावेळी करण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती देत शासनाकडून आम्हाला तातडीची मदत मिळणे गरजेचे आहे अशी मागणी पालकमंत्र्यांकडे केली. अतिवृष्टीमुळे घरांचीही पडझड झालेली आहे, हेही त्यांनी पालकमंत्र्यांना सांगितले. ढगफुटी सदृश पावसामुळे अनेकविध ठिकाणी शेतांमध्ये अक्षरशः तलाव साचल्याचे दृश्य होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पिके सडून गेली आहेत. त्यामुळे हातचे पीक सडून गेल्याने शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून भरीव मदत मिळवून देण्याची मागणी संजय रायमुलकर यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार भूषण पाटील, निलेश मडके, नायब तहसीलदार अजय पिंपरकर, महसूल, पंचायत समिती, कृषी विभागाचे संबंधित अधिकारी,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, तालुकाप्रमुख भगवान पाटील सुलताने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती कारभारी सानप युवा सेनेचे तालुकाप्रमुख गजानन मापारी ,शिवसेनेचे शहर प्रमुख पांडुरंग सरकटे, हिम्मतराव सानप ,विजयकुमार सानप, गणेश ढवळे ,मोतीराम ढवळे, शिव पाटील तेजनकर, शैलेश सरकटे, देवा ठाकूर, अभिषेक सरकटे, अशोक वारे ,शेख रफिक, बाबू सिंग जाधव, राजेंद्र पळसकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### पुण्यात अजित पवार यांचा भाषणातून कार्यकर्त्यांना सल्ला



**पुणे/प्रतिनिधी :** तुम्ही आता राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आहात. तुमच्याकडे कधी, कुठे ,काही चूक होऊ देऊ नका. कुठे चौफुल्याला जाऊन तडफडू नका. कुठे जाऊन (ठाक-ठाक) गोळ्या चालवू नका. आमदार शंकर मांडेकर यांच्यासमोरच अजित पवारांनी कार्यकर्त्यांना तंबी दिली आहे. शंकर मांडेकर यांच्या भावावरती चौफुला येथे गोळीबार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. यासह वैष्णवी हगवणे प्रकरणावर देखील अजित पवारांनी भाष्य केले. काहीजणांनी कशाप्रकारे आपल्या सुनांना त्रास दिला? आम्ही लग्नात गेलो हा आमचा दोष का ? आम्ही त्यांना सुनेला त्रास द्यायला सांगितलं का? मांडेकर यांनी केलाला गोळीबार प्रकरण आणि वैष्णवी हगवणे प्रकरणावर अजित पवार यांनी आज पुण्यातील पीडीसीसी बँकेत एका कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी कार्यकर्त्यांना सल्ला दिला.

### मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी जो निर्णय घेतला तो मला मान्य ; मंत्री माणिकराव कोकाटे यांची माहिती




**पुणे/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी जो निर्णय घेतला तो मला मान्य आहे.अशी माहिती मंत्री माणिकराव कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, माझी वाटचाल पुढे चालू राहणार आहे. दत्तात्रय भरणे हे शेतकरी पुत्र आहेत. त्यांना मी मदत करेन. त्यांना हे खाते सोपवल्यामुळे खात्याला न्याय मिळेल. जेव्हा गरज पडेल, तेव्हा मी दत्तात्रय भरणे यांची मदत करेन. मी नाराज नाही,असे स्पष्टीकरणही यावेळी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना दिले.

### मनोज जरांगे पाटलांमुळे या तपासाला गती आली ज्ञानेश्वरी मुंडे यांची माहिती

**बीड/प्रतिनिधी :** मनोज जरांगे पाटलामुळे मयत महादेव मुंडे यांच्या तपासाला गती आली आहे. अशी माहिती मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. बीड जिल्ह्यातील परळी येथील मयत महादेव मुंडे यांना न्याय देण्यासाठी आणि पुढील लढाई कशी लढायची ? यावर चर्चा करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला सर्व समाजातील नागरिकांनी यावे, असे आवाहन देखील करण्यात आले होते. तर याच बैठकीसाठी मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे देखील बीडमध्ये आल्या. यावेळी त्यांनी बोलताना म्हटलं की, मनोज जरांगे पाटलांचे मोठेपण म्हणावे लागेल की, त्यांनी आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त एका सर्व सामान्य कुटुंबातील व्यक्तीला न्यायासाठी बैठकीचे आयोजन केले आहे. आज सर्व समाजातील नागरिकांना आवाहन केले आहे. त्यामुळे आम्ही देखील या बैठकीसाठी आलो आहोत. आणि यापुढचा लढा मनोज जरांगे पाटलांच्या माध्यमातून लढवला जाणार आहे.या लढ्याला विष प्राशन केल्यानंतर गती आली आहे. चौकशी सुरू आहे, मुख्यमंत्र्यांची भेट झाली, जितेंद्र आव्हाड यांनी देखील लक्ष घातले, सुप्रिया सुळेंनी देखील लक्ष घातले, आणि हे सर्व मनोज जरांगे पाटलांमुळे झाले आहे. असं म्हणत ज्ञानेश्वरी मुंडे यांनी यावेळी प्रतिक्रिया दिली.

### दौंडच्या यवतमधील तणावपूर्ण स्थिती नियंत्रणात ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माध्यमांशी माहिती



**पुणे/प्रतिनिधी :** दौंडच्या यवतमधील तणावपूर्ण स्थिती नियंत्रणात असून या घटनेची सगळी माहिती घेतली आहे.अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की,बाहेरच्या व्यक्तीने चुकीच स्टेटस ठेवल्याने आणि पुजाऱ्याने बलात्कार केल्याचा स्टेट्स ठेवल्याने तणाव निर्माण झाला आणि लोक रस्त्यावर आले. काही ठिकाणी लाठीचार्ज करावा लागला. आता परिस्थिती नियंत्रणात आहे.दोन्ही समाजाची लोक एकत्रित बसली आहेत, तणाव संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. काही लोक जाणीवपूर्वक तणाव निर्माण झाला पाहिजे, असे स्टेट्स ठेवत आहेत. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. काल सभा म्हणून असे स्टेट्स ठेवण्याची मुभा दिली आहे का ? चुकीच्या पद्धतीने धर्मावर अवलंब करणाऱ्यांवर टीका करण्याचे अधिकार नाहीत. आता ते वीडियो तिथले आहे की, बाहेरचे हे बघावे लागेल. अशा वेळी अनेकवेळा बाहेरचे वीडियो टाकले जातात. या सगळ्या घटनेची चौकशी केली जाणार आहे. सगळ्यांनी शांतता ठेवली पाहिजे, कुणीही कायदा हातात घेऊ नये. कुणीही बेकायदेशीर कृत्ये करत असतील, तर कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

# अतिवृष्टी पाहणी दौऱ्यात पालकमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप





**लोणार :** लोणार तालुक्यातील सर्व मंडळात मागील आठवड्यात ढगफुटी सदृश्य पाऊस पडला अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले तर अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या तर आठ ते दहा दिवसांपासून शेताला तलावाचे स्वरूप आले असून त्यामध्ये शेतकऱ्यांचे उभे पिके सडून गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेले घास निसर्गाने हिरावून नेला त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून तात्काळ मदत मिळावी अशी शेतकऱ्यांनी मागणी केली आहे आज १२ वाजल्यापासून पालकमंत्री मकरंद आबा पाटील व आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात , जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी , तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी ,सह तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ, बिबखेड, वडगांव तेजन, सह अनेक गावांत शेतकऱ्यांच्या बांधावर जात शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या व जे काही मंडळ व गावे अतिवृष्टीत बसले नाहीत त्यांचाही समावेश करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, तहसीलदार, कृषी अधिकारी यांना पालकमंत्री यांनी दिल्या असुन नुकसानीपासून कोणीही वंचित राहणार नाही असे आश्वासन पालकमंत्री मकरंद आबा पाटील, आमदार मनोज कायंदे,यांनी दिले या दौऱ्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नितीन कायंदे, सदाशिव मुंडे, अरविंद चव्हाण, सुनिल केंद्रे, रमेश आंधळे, अंबादास खंड, गजानन मुर्तडकर विठ्ठल आटोळे,सह शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते

## पालकमंत्र्यांच्या गळ्यात डॉ. बछीरे घातली १० प्रश्नांची माळ

दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान



**सुलतानपूर :** बुलढाण्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या गळ्यात डॉ. बछीरे घातली १० प्रश्नांचे लेबल लावलेले पुष्पहार घालण्यात आले

सविस्तर बातमी अशी की, लोणार तालुक्यात अतिवृष्टीची पाहणी करण्यासाठी आलेले पालकमंत्री माननीय मकरंद पाटील यांना विश्रामगृह येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे यांनी पालकपत्रांच्या स्वागतासाठी शेतकऱ्यांच्या समस्याचे दहा प्रश्नाचे लेबल चिटकवून पालकमंत्र्याचे अगळे वेगळे स्वागत करून पालकमंत्र्यांना प्रश्न विचारले डॉ. बछीरे यांनी पालकमंत्र्यांना विचारलेले प्रश्न

१) पश्चिम महाराष्ट्र प्रमाणे विदर्भात सरसकट नुकसान भरपाईचे अग्रीम सानुग्रह अनुदान कधी देणार?

२) गत २ वर्षाची गारपीटीची नुकसान भरपाई कधी देणार?

३) गत २ वर्षाच्या अतिवृष्टीची मदत कधी मिळणार?

४) शेतकऱ्यांचा सातबारा कधी कोरा होणार?

५) गत ३ वर्षाचा पिक विमा शेतकऱ्यांना कधी देणार?

६) शेतकऱ्यांना पीक कर्जातून कधी मुक्त करणार?

७) शेतकऱ्यांची वीज बिल कधी माफ करणार?

८) २०२५ च्या अतिवृष्टीची नुकसान भरपाई कधी देणार?

९) महाराष्ट्र शासन शेतकऱ्यास कधी दिलासा देणार?

१०) जल जीवन मधील भ्रष्टाचार दूर करून घर घर नल मे जल कधी देणार?

पालकमंत्र्याच्या गळ्यात या प्रश्नांचे लेबल लाऊन स्वागत पुष्पहार घालून निवेदन देऊन विचारणा केली असता पालकमंत्री यांनी लवकरात लवकर या प्रश्नांची उत्तर आपणास मिळतील अशी हमी सर्व जनसमुदाया समोर दिली. याप्रसंगी मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार माननीय सिद्धार्थ खरात साहेब, शिवसेना उबाठाचे जिल्हा उपप्रमुख प्रा.आशिष रहाटे, तालुकाप्रमुख राजू बुधवत, शहर प्रमुख गजानन जाधव, महिला तालुका संघटिका तारामती जायभाये, संजीवनी वाघ, लूकमान कुरेशी, श्रीकांत मदनकर, तानाजी मापारी, सुदन अंभोरे सर, तानाजी अंभोरे, कैलाश अंभोरे, ज्ञानेश्वर दूधमोगरे, अशपाक खान, फहीम खान, रामभाऊ मोरे, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## रिंकु राजगुरू, सुबोध भावेची धम्माल केमिस्ट्री; बेटर-हाफची लव्हस्टोरीमधलं गाणं प्रदर्शित

**मुंबई/प्रतिनिधी :** सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत बेटर-हाफची लव्हस्टोरी या चित्रपटातील पहिलं गाणं पालतू फालतू नुकतंच प्रदर्शित झालं असून, प्रेक्षकांसाठी एक भन्नाट, गंमतीशीर अनुभव घेऊन आलं आहे. सुबोध भावे आणि रिंकू राजगुरू यांच्यावर चित्रित झालेलं हे गाणं लग्नानंतरच्या परिस्थितीचा आरसा दाखवणारं आहे.

सुबोध भावेच्या मनातील वैताग, गोंधळ आणि त्याच्या प्रतिक्रियांचा एक मिश्कील कोलाज या गाण्यातून मांडण्यात आला आहे. हे विनोदी गाणं सुप्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते यांच्या आवाजात रंगलेलं असून ह्या गाण्याचे बोल संजय अमर आणि साजन पटेल यांनी लिहिलं असून अमेय नरे आणि साजन पटेल यांचं खटकेबाज संगीत पालतू फालतू या गाण्याला लाभलं आहे.

गाण्याविषयी दिग्दर्शक संजय अमर म्हणाले, ''पालतू फालतू हे गाणं प्रत्येक नवऱ्याच्या मनातील हक्काच्या बडबडीचं प्रतिनिधित्व करतं. सुबोध आणि रिंकूने या दृश्यांना ज्या सहजतेने जिवंत केलं, ते खरंच बघण्यासारखं आहे.हे एक गंमतीशीर गाणं आहे.''

तर निर्माता रजत अग्रवाल म्हणतात, ''या गाण्यातून प्रेक्षकांना लग्नानंतरच्या नात्याची गंमतीशीर बाजू पाहायला मिळते. आजच्या तरुण प्रेक्षकांना ही शैली स्वतःशी मिळतीजुळती वाटू शकते आणि म्हणूनच हा चित्रपटही त्यांना जोडून ठेवेल.''

बेटर-हाफची लव्हस्टोरी या चित्रपटाचं लेखन, छायांकन आणि दिग्दर्शन संजय अमर यांनी केलं आहे. रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित या चित्रपटाचे निर्माता रजत अग्रवाल आहेत. साजन पटेल आणि अमेय नरे यांचे संगीत, तसेच सुबोध भावे, रिंकू राजगुरू, प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांच्या दमदार भूमिका या सिनेमाला एक वेगळीच उंची देतात. गूढ, विनोद आणि प्रेमाचा अफलातून मेळ असलेल्या 'बेटर-हाफची लव्हस्टोरीचा टिझर आधीच चर्चेत आला असून आता हे गाणं देखील सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. येत्या २२ ऑगस्ट रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

### शेकापचा वर्धापन दिन मेळावा पनवेलमध्ये होणार, मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची असणार उपस्थिती!

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** शेतकरी कामगार पक्षाचा (शेकाप) ७८ वा वर्धापन दिन यावर्षी पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. येत्या २ ऑगस्टला नवीन पनवेल येथे शेकापचा वर्धापन दिन मेळावा होणार आहे. विशेष म्हणजे या मेळाव्याच्या मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित असणार आहेत. त्यामुळं या मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. दरम्यान, लवकरच पनवेल महानगरपालिका त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. त्या अनुषंगानं उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या एकत्रित येण्यानंतर शेकापला सोबत घेऊन निवडणूक लढण्याचं चित्र दिसून येत आहे.

## अवैध दारू विक्री विरोधात कुऱ्हा येथील महाला धडकल्या रिसोड पोलिस स्टेशनला

दैनिक आपला विदर्भ



**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील कु-हा येथिल मजुर वर्गातील महिला शेती मजुरी करून आपल्या संसाराचा गाडा हाकतात.परंतु गावातील तीन इसम अवैध रित्या दारू विक्री करतात.महिला वर्ग मजुरीला गेल्या नंतर कुटुंबातील लहाण-मोठे व्यक्ती घरातील मिळेल त्या वस्तु,अन्नधान्य विक्री करून दारू पितात.पर्यायाने अनेक कुटुंबातील दररोजच्या भांडण तंट्यांना कंटाळुन आज ता.१ ऑगस्ट ला सायंकाळी ६ वाजता शेकडो महिलांनी रोद्ररूपाने रिसोड पोलिस स्टेशन ला दारू बंदी साठी धडक दिली.

कु-हा गावातील दारू बंद करा दारूमुळे होणाऱ्या रोजच्या किटकिटी,भांडण,तंटे व व्यर्थ खर्च,यामुळे गावातील महिला ह्या वैतागलेल्या आहे.दारूमुळे अल्पवयीन मुले सुद्धा नशेच्या आहारी जात आहेत.यामुळे महिलांच्या अभ्यासावर परिणाम होत असुन त्यांच्या भविष्याचा परिणाम बद्दल पालकांना चिंता आहे.या दारूमुळेच अनेक संसार उध्वस्त होऊन अनेक संसार उध्वस्तीच्या मार्गावर आहेत. महिलांनी आपली दैनंदिन कामे करायची व रात्री दारूमुळे घरातील माणसाच्या किटकिटी ऐकायच्या या सर्व बाबीला कंटाळून रिसोड तालुक्यातील कुऱ्हा येथील महिला दिनांक एक ऑगस्ट रोजी संध्याकाळी रिसोड पोलीस स्टेशनला धडकल्या.या ठिकाणी ठाणेदार व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना गावातील दारू बंद करण्यासंदर्भात मागणी केली.या ठिकाणी उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांना महिलांनी आपल्या व्यथा मांडल्या व गावातील दारूमुळे दूषित होत असलेल्या वातावरणाबद्दल माहिती दिली. याव्यतिरिक्त गावात कोण कोण दारू विकत आहे.याबद्दलही महिलांनी पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले.रिसोड तालुक्यातील कुऱ्हा येथे दारू चा अक्षरशः महापुर आल्या असल्याचे महिलांनी सांगितले.

या ठिकाणी बिनधास्तपणे अवैध दारू विक्रेते हे विक्री करत असुन कोणाचीही ऐकण्याच्या मनस्थितीत ते नाही व त्यांचे मनोबल खूप वाढले असल्याचे कुऱ्हा येथील महिलांचे म्हणणे आहे.आपली व्यथा मांडण्यासाठी रिसोड पोलीस स्टेशनला आलेल्या महिलांसोबत पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी चर्चा केली व लवकरच गावात येऊन अवैध दारू विक्रेत्यांचा बंदोबस्त करणार असे सांगितले. यावेळी कुऱ्हा येथील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

> गावातील अवैध दारू विक्रीचा विषय अत्यंत गंभीर असुन याचा महिला व मुलांवर परिणाम होत आहे. दारूमुळे होणारे दुष्परिणाम बघता ग्रामसभेत ठराव घेऊन सदर दारूबंदीचा प्रस्ताव पास करू व गावातील दारू कायमचीच बंद करू.
>
> -भारत देविदास नागरे
> (सरपंच कु-हा)

## प्रदूषण वाढणार नाही, याची काळजी सर्वधर्मीय यांनी घेतले पाहिजे : मंत्री पंकजा मुंडे यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक/प्रतिनिधी :** धार्मिक कार्यक्रम करताना प्रदुषण वाढणार नाही, याची काळजी सर्वधर्मीयांनी घ्यावी,असे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की,क्रेडाई नाशिक आयोजित केलेल्या या कार्यक्रमात क्रेडाई ने काही संकल्प केले आहेत. प्रयगराज कुंभ आणि नाशिक कुंभ मध्ये खूप फरक आहे. आपल्या इथे जागा कमी आहे. त्यामुळे या सगळ्या गोष्टींचा विचार मुख्यमंत्री करत आहेत.महाकुंभ ब्रँड अंबसेटर बना अस मला सांगितले, पण कुठल्या अर्थाने बना हे मला कळालं नाही. डोंगर बनवता येईल का? आपल्याला ते शक्य नाही, आपण बिल्डिंग बनवू शकतो. शहरात गर्दी होऊ नये, त्यामुळे ग्रामीण भागात उद्योग वाढले पाहिजे. पुण्यात एक टोकावरून वरून दुसऱ्या टोकाला जाण्यासाठी पावणे दोन तास लागतात. नाशिकचा अजून वाटोळ झाल नाही, थोडाफार सुरवात झाली आहे. धार्मिक गोष्टी करताना प्रदूषण वाढणार नाही, याची काळजी सर्वधर्मीय यांनी घेतले पाहिजे.५२ टक्के पाणी प्रक्रिया न होता नदीत जात आहे. शहरात तरी काही ठिकाणी नियम पाळतात. ग्रामीण भागात तरी कुठेही डोंगर तोडत आहेत आणि इतर गोष्टी होत आहेत. नदी पुनर्जन्म हा सुंदर प्रकल्प आम्ही हाती घेत आहोत. अशी माहिती मंत्री पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## उमरखेड शहरात सकल कुरेशी (खाटीक) समाजाचा विविध मागणीसाठी मुकमोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यातील कुरेशी (खाटीक) समाज हा अनेक वर्षांपासून पारंपरिक मांस व्यवसायाशी निगडित असून त्याद्वारे उपजीविका चालवतो. मात्र, सध्याच्या सामाजिक व कायदेशीर परिस्थितीत या समाजाला गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यात शेतकरी, हिंदू बांधव, मुस्लिम आणि खाटीक समाजातील पशु व्यापारी एका बाजारातून दुसऱ्या बाजारात म्हशी, बेकाम रेडा जनावरे वाहनाने नेताना कायदेशीर दाखले असतानाही पोलिस वाहने थांबवतात आणि प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६०, कलम ११/१ (अ) अंतर्गत गुन्हे दाखल करतात. पोलिस ओव्हरलोड जनावरांची वाहने पकडून गोशाळांना पाठवतात, जरी दंड आकारून ही वाहने सोडण्याचा अधिकार त्यांना आहे. कोर्टाच्या आदेशानुसार जनावरे सोडवण्यासाठी शेतकरी आणि खाटीक समाजाला गोशाळांना मोठा दंड भरावा लागतो, जो कधीकधी जनावराच्या किमतीपेक्षा जास्त असतो. यामुळे आर्थिक नुकसान होते. पोलिसांनी खाटीकांना मांसासह पकडल्यास, ते मांस म्हशी किंवा बेकाम रेड्याचे असले तरी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ (गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा) अंतर्गत गुन्हा नोंदवतात आणि आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठवतात. तीन महिन्यांनंतर प्रयोगशाळेचा अहवाल नकारात्मक येतो, जे खाटीक समाजावरील बेकायदेशीर कृत्य आहे.

आपल्या शासनाने म्हशी आणि बेकाम रेडा कत्तलीसाठी परवानगी देऊन नगरपालिका/महानगरपालिकांना म्हशी आणि बेकाम रेडा कत्तलीसाठी आधुनिक कत्तलखाने ( ) किंवा तात्पुरते कत्तलखाने लवकरात लवकर बांधाण्याचे आदेश द्यावे,पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी वैद्यकीय सुविधा आणि कत्तलीसाठी लागणारे योग्य प्रमाणपत्र तात्काळ उपलब्ध करून द्यावेत,भारतीय न्याय संहिता () १०६ नुसार, पोलिसांनी जनावरांची वाहने गोशाळांना न पाठवता जामिनावर सोडावीत. प्रथम प्रयोगशाळेचा अहवाल मागवावा आणि त्यानंतरच गुन्हा () दाखल करावा. कायद्याप्रमाणे पोलिसांना माहिती न देता वाहने थांबवण्याचा कोणालाही अधिकार नाही. शासनाने अशा घटनांवर कठोर कारवाई करावी व म्हशींच्या आणि रेडाच्या मांसासाठी सिंगल विंडो सिस्टम सुरू करणे.

वरील मागण्या लवकरात लवकर मान्य करून कुरेशी (खाटीक) समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच व्यवसाय सुरक्षा आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी धोरणात्मक उपाययोजना राबवाव्यात, या अश्याचे निवेदन मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य, मुंबई व राज्यपाल महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना उपविभागीय अधिकारी , उपविभाग्य कार्यालय, उमरखेड यांच्या मार्फत जमेतूल कुरेश उमरखेड यांनी मूक मोर्चा काढत दिला. यावेळी मो. सिद्दीक कुरेशी अध्यक्ष जमेतूल कुरेश उमरखेड, शेख खाजा कुरेशी,शेख इरफान कुरेशी,इनायतउल्लाह खान, जियाउलहक शेख,सय्यद इरफान,तालीब अहेमद, साजीद जागीरदार, रसुल पटेल,मो.शाहाबोद्दीन कुरेशी,वासीफ पठाण व सकल कुरैशी समाज, उमरखेड / महागांव तालुका उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### अवैधपणे गांजा वाहतूक करणाऱ्या आरोपीला तहसील पोलिसांनी केली अटक



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** अवैधपणे गांजाची वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला तहसील पोलिसांनी अटक करत एक लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जीलू नायर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तहसील पोलीस स्टेशनच्या हद्दीत बांगलादेशच्या गार्ड लाईन परिसरातून गांजाची वाहतूक करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी सापळा रचत त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याच्या सुटकेस मधून आठ किलो गांजा मिळून आला. त्याने हा गांजा ओरिसा इथून आणला होता, हा कोणाला देणार होता याचा तपासाचा पोलीस करत आहेत.

### स्थानिक संस्था निवडणुकीत महायुतीचा झेंडा फडकणार- मंत्री उदय सामंत यांचा विश्वास

**पुणे/प्रतिनिधी :** शिवसेना निकालाबाबत सुप्रीम कोर्टात हे प्रकरण सुरू आहे. आपल्या सगळ्यांना माहीत आहे. निवडणुकीच्या तोंडावर सुप्रीम कोर्टात जाऊन, एक वेगळ्या प्रकारचे प्रयन्त नेहमी ठाकरे गट करत असते, आपल्याला ज्ञात आहे.आमची भुमीका आम्ही सुप्रीम कोर्टात पुढे मांडू आणि योग्य ती निकाल सुप्रीम कोर्ट देईल. असा आम्हाला विश्वास आहे. ज्यावेळेस निवडणुका लागतील त्यावेळेस मुंबई महानगरपालिका सह पंचायत समितीचे पासून नगरपालिकेवर महायुतीचा भगवा झेंडा फडकेल.असा विश्वास मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. यावेळी ते म्हणाले की, कोकाटे बाबत त्यांनी जो निर्णय घेतला आहे, तो त्यांच्या पक्षाच्या आहे. त्यावर मी काही बोलू इच्छित नाही. रेव्ह पार्टी आम्हाला असे वाटते याबाबत न्यायालय हे निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत. त्यांच्या कुटुंबीयांनी पण सांगितले की, आमचा न्यायालयावर विश्वास आहे. त्यावर आम्ही बोलणं योग्य नाही, राजकीय हस्तक्षेप असेल तरी न्यायालय निर्णय देईल. योगेश कदम बार प्रकरण हा पोलीस चौकशीचा भाग आहे. त्याच्यावर मी टिपणी करणं म्हणजे त्यावर हस्तक्षेप केला सारख होईल.असे मतही यावेळी मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### जिल्ह्यात गणेशोत्सवापूर्वीच ८० टक्के मूर्तींची बुकिंग पूर्ण

**नंदुरबार/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाला अजून एक महिना अवधी असतानाच शहरासह जिल्ह्यात गणेश मूर्तींच्या बुकिंगला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. सध्या जवळपास ८० टक्क्यांहून अधिक मूर्ती बुक झाल्या असून, उर्वरित मूर्तीही लवकरच विक्रीसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. वाढत्या मागणीमुळे मूर्ती विक्रेत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. यंदा मूर्ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचे भाव वाढल्याने मूर्तींच्या किंमतीत वाढ झाल्याचे दिसत आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस, रंग, गोंद, सजावटीच्या वस्तू यांचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. परिणामी, मूर्तींच्या किमतीतही सरासरी १५ ते २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ५ फूटांवरील आकर्षक मूर्ती १० ते १५ हजार रुपयांपर्यंत तर २० ते २५ फूट उंचीची मूर्ती २ लाख रुपये पर्यंत विकली जात आहे. जिल्ह्यात नंदुरबार शहरासह शहादा, तळोदा, अक्कलकुवा, नवापूर भागात सध्या ३० ते ३५ मूर्ती कारखाने कार्यरत आहेत. या कारखान्यात अनेक कारागीरांनी जून महिन्यापासूनच मूर्ती तयार करण्यास सुरुवात केली होती. कारखान्यांमध्ये स्थानिक युवक, महिला, दिव्यांग कलाकार अशा विविध स्तरातील लोकांना रोजगार मिळाला आहे.मूर्ती विक्रीसह सजावटीच्या साहित्य, शाडू मातीची पारंपरिक व आकर्षक पद्धतींच्या मूर्तींची मागणीही झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने शहर व ग्रामीण भागात मिळून तब्बल ५ ते ६ कोटी रुपयांची उलाढाल होणार असल्याचा अंदाज आहे.गणपतीच्या आगमनासाठी भाविकांची तयारी सुरू असून पर्यावरणपूरक शाडू मातीच्या मूर्तींनाही वाढती मागणी आहे.अशी माहिती मूर्तिकार धर्मा चौधरी व मूर्तिकार प्रतीक चौधरी यांनी दिली आहे.

### जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी केंद्र शासनाने मुदतवाढ दिली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै, २०२५ अशी होती. तथापि, गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी सहभाग, ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी नसणे, तसेच पीएमएफबीवाय, आधार, सीएससी सर्व्हर आणि राज्याच्या भूमी अभिलेख पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांच्या सहभागावर परिणाम झाला. त्यामुळे, केंद्र शासनाने या योजनेत सहभागी होण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. आता, बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १४ ऑगस्ट, २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तर, कर्जदार शेतकऱ्यांसाठी ही मुदत ३० ऑगस्ट, २०२५ पर्यंत असेल.

या वाढीव कालावधीत जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घ्यावा. नोंदणी करताना कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता संबंधित विमा कंपनी व बँक यांनी घ्यावी, असे निर्देश दिले आहेत.

# 'माहिती आयोग आपल्या दारी' उपक्रमांतर्गत गडचिरोलीत १०० अपील प्रकरणांची सुनावणी

## नागरिकांच्या अधिकारांची जोपासना अधिक जोमाने होईल – मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे



दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिधी :** राज्य माहिती आयोगाने गडचिरोलीसारख्या दूरस्थ भागात पारदर्शक प्रशासनासाठी सकारात्मक पावले उचलत 'माहिती आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत प्रथमच थेट गडचिरोलीत सुनावणी घेतली. यावेळी माहितीच्या अधिकाराखाली दाखल झालेल्या १०० द्वितीय अपील प्रकरणांवर निर्णय देण्यात आले. राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे आणि नागपूर खंडपीठाचे माहिती आयुक्त गजानन निमदेव यांच्या उपस्थितीत नियोजन भवन येथे या सुनावणीचे आयोजन करण्यात आले होते.

गडचिरोली जिल्ह्यातील माहिती अधिकार अपील प्रकरणात आयोगाकडील २०२३ पर्यंतच्या प्रलंबित प्रकरणाचा पूर्णपणे निपटारा करण्यात आला असून २०२३ पर्यंत झिरो पेंन्डसीचे उद्दिष्ट गाठल्याचे व लवकरच पुन्हा एक सुनावणी आयोजित करून २०२४ –२५ पर्यंतचे अपिलांचा निपटारा करण्यात येणार असल्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडेमुख्य राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी यावेळी सांगितले. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने नागरिकांच्या अधिकारांची जोपासना अधिक जोमाने होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठामार्फत आयोजित या सुनावणीत जिल्ह्यातील विविध सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित महत्त्वाची प्रकरणे हाताळण्यात आली. या उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील अर्जदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना नागपूर वा मुंबईस जाण्याची आवश्यकता भासली नाही, परिणामी त्यांचा वेळ, आर्थिक खर्च आणि श्रम वाचले असल्याचे माहिती आयुक्त गजानन निमदेव यांनी सांगितले. सामान्य नागरिकांना माहितीच्या अधिकाराचा प्रभावी लाभ देण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या 'माहिती आयोग आपल्या दारी' या उपक्रमातून जिल्हास्तरीय अडचणींचे निवारण स्थानिक पातळीवरच होऊ लागल्याची व यामुळे सुनावणीच्या प्रक्रियेला गती मिळाल्याचे तसेच वेळची व पैशाची बचत झाल्याची प्रतिक्रीया यावेळी उपस्थित अर्जदारांनी दिली.

राज्य माहिती आयुक्तद्वयांनी उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकाऱ्यांना 'माहितीचा अधिकार कायदा, २००५' अंतर्गत प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याच्या सूचना दिल्या. तसेच माहितीचे अधिकार सक्षमपणे कार्यान्वित करण्यासाठी जनजागृती वाढविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. माहिती आयोगाच्या उपसचिव रोहिणी जाधव यांच्यासह आयोगाचे दहा अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## पी एम सन्मान निधीचा २० हप्ता २ ऑगष्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार वितरित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा येथे होणाऱ्या स्थानिक कार्यक्रमात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव होणार सहभागी**



**बुलढाणा/प्रतिनिधी :** पी एम किसान सन्मान निधीचा विसावा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या २ ऑगस्टला हस्तांतरित होणार आहे त्यानिमित्य बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्र येथे होणाऱ्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव उपस्थित राहणार आहेत.. पीक लागवडीच्या काळात शेतकऱ्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने पी एम किसान सन्मान योजना केंद्र सरकारच्यावतीने कार्यान्वित करण्यात आली आहे या योजनेअंतर्गत दरवर्षी शेतकऱ्यांना दोन हजाराचे तीन टप्पे असे एकूण ६००० रुपये देण्यात येतात पी एम किसान योजनेचा २० टप्पा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २ ऑगस्टला वितरित केल्या जाणार आहे त्यानिमित्य एका कार्यक्रमाचे आयोजन बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्रामध्ये सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरित होणाऱ्या शेतकरी सन्मान निधी वाटप कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कृषी विज्ञान केंद्रात केल्या जाणार आहे. त्याच प्रमाणे कार्यक्रमा मध्ये शेतकऱ्यांना सुधारित सोयाबीन लागवड तंत्रज्ञान, हुमणी कीड ओळख व एकात्मिक व्यवस्थापन आणि सघन आंबा लागवड तंत्रज्ञान इत्यादी विषयावर मार्गदर्शन सुद्धा करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील आमदार संजय गायकवाड आमदार धीरज लिंगाडे उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमाला जास्ती जास्त शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ अमोल झापे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा श्री मनोज ढगे, प्रकल्प संचालक आत्मा श्री पुरुषोत्तम उन्हाळे यांनी केले आहे

## नागरे महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** ०१ऑगस्ट २०२५ रोजी आमच्या नारायणराव नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाविभागतून लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राचार्य डॉक्टर विजय नागरे होते याप्रसंगी महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. दीपक देशमाने यांनी केले. या कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. गणेश घुगे व प्रा. बी. डी. शिंदे हे उपस्थित होते व यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अश्विनी नागरे तसेच आभार प्रदर्शन कु. प्रेरणा नागरे यांनी केले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, समाधान गायकवाड सुरेश थोरात, अजिंक्य घोडके, डॉ. जयश्री ठाकरे, तहसीलदार वृषाली केतकर, विजय सवडे यांच्यासह उपस्थित अधिकारी –कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्याकडून साहित्यसम्राट आण्णाभाऊ साठेंची जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** लोकनायक साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमीत्य आज आण्णाभाऊ साठेंना अभीवादन करण्यात आले. या वेळी आंबेडकरी चळवळीतील भाई कैलास सुखधाने, जेष्ठ नेते सोपानराव देबाजे, तथागत ग्रूपचे संस्थापक अध्यक्ष यूवा नेते संदिपदादा गवई, माजी नगरसेवक सुरेश मानवतकर, संपादक रविंद्र वाघ, समाधान साठे, डॉ बाबासाहेब आंबेडकर सह पत संस्थेचे अध्यक्ष विजय खिल्लारे, पत्रकार तथा शाहिर देवानंद वानखेडे, लहुशक्तीचे संदिप कांबळे, ज्योती इंगळे, लताबाई ताकतोडे ता अध्यक्ष लहुशक्ती, राजू आवारे, आश्रू मानवतकर, आदि चळवळीतील अनेक नेते ऊपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ विचारवंत प्रा डि एस वाघसर हे होते, या वेळी वंचित पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिपक पाडमूख यांच्यासह ईतर सहका- यांनी देखील साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केले. शाहीर पवार यांनी यावेळी आण्णाभाऊ साठे यांच्या जिवनावर पोवाडा सादर केला. कार्यक्रमाचे संचालन रविंद्र वाघ यांनी तर आभार तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांनी मानले.

# अल्पसंख्याक समाजापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवा- ललित गांधी

## जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष यांनी घेतला विविध विषयाचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासनासोबत बैठक घेऊन जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण व नागरी क्षेत्रविकास कार्यक्रमासह अल्पसंख्याकांना देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेतला. शासनाच्या विविध योजनाचा लाभ अल्पसंख्याक समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजीत बैठकीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले की, अल्पसंख्याक समुदायाची लोकसंख्या विचारात घेवून जिल्ह्यात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. यासाठी अल्पसंख्याक समुदायाचे वर्गीकरण करणे आवश्यक असून कोणताही समाज विकासापासून वंचित राहू नये यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. अल्पसंख्याक समुदायाच्या भागातील रस्ते, सभागृहाची राहिलेली अपूर्ण कामे वेळेत पार पाडावी. बुलढाणा जिल्ह्यातील जैन समाजाच्या



प्राचिन मंदिरांना तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्हा उद्योग केंद्राकडील अल्पसंख्याक समुदायासाठी ३ टक्के राखीव असलेली कर्ज प्रकरणे तातडीने मार्गी लावावी. तसेच व्यवसाय कोणत्या पध्दतीने केला पाहिजे यासाठी जिल्हा उद्योग केंद्र आणि बँकांनी शिबीरे घेवून गरजवंतांना कर्ज मंजूर करावेत, असे सूचना दिल्या. तसेच जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

निबंध स्पर्धा पुरस्कारांचे ललित गांधी यांच्या हस्ते वितरण

भगवान महावीर निर्वाण कल्याणक निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर निवड झालेल्या स्पर्धेकांना जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांच्या हस्ते नियोजन भवन सभागृहात प्रमाणपत्र व धनादेश वितरण करण्यात आले. यामध्ये निधी भन्साली, चंदन देशमाने, रिध्दी मेहत्रे, श्रावणी गायकवाड, ऋतुजा चेके, दिव्या औतकर, अरहिंत बोरुंदीया, श्रेयश परसाने, लबांधी खातोड व समृद्ध चिंचोले यांना पारितोषिक देण्यात आले.